# उजळावया आलो वाटा

विश्वात्मक संत साहित्य संमेलन

उजळावया आलो वाटा

ईश्वरनिष्ठांची मांदियाळी


संपादक

ह.भ.प.मदन महाराज गोसावी

# विश्वात्मक संत साहित्य संमेलन २०२२, कोल्हापूर

# उजळावया आलो वाटा

**Ujalavaya Aalo Wata**

प्रकाशन क्रमांक : ४००

ISBN : 978-81-952819-9-2

©

**अमरवाणी इव्हेंटस् फाऊंडेशन**

भक्ती मंदिर, तिवारी इस्टेट, पाचपाखाडी, ठाणे ४००६०२

९८२०४१८३९०/९०११००१००

Email : amarwanievents@gmail.com

♦

प्रकाशक

**सुनिताराजे पवार**

**संस्कृती प्रकाशन**

६८८, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे - ४११ ०३०

फोन : ०२०-२४४९७३४३ मोबाइल : ९८२३०६८२९२

Email : sanskrutiprakashan@yahoo.com

www.sanskrutiprakashan.com

मुखपृष्ठ

**संदिप दिनेश घोडके**

मांडणी

**अमृता खेतमर । प्रदीप खेतमर**

आर्ट ॲडव्हर्टायझिंग, पुणे

मुद्रित शोधन

मराठी विभाग : **आर्ट ॲडव्हर्टायझिंग**

संस्कृत विभाग : **डॉ. संगिता चंद्रात्रे । डॉ. भाग्यश्री भलवतकर**

हिंदी विभाग : **डॉ. मीरा निचळे**

इंग्रजी विभाग : **डॉ. अच्युत दाणी**

मुद्रक

**एस. एस. प्रिंटर्स**

मूल्य

**रुपये ९०० फक्त**

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

**(या ग्रंथात प्रकाशित झालेल्या मतं-विचारांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)**

- संतांच्या कार्याची विश्वात्मकता : ह. भ. प. बाळकृष्णमहाराज गिरी । २७४
- ज्ञानयोगी संत : श्री पंतमहाराज बाळेकुंद्री : प्रा. कौमुदी जमखंडीकर । २७९
- स्वामी म्हणे झाले कृतार्थ जीवन । सद्गुरू चरण उपासिता ।। : प्रमोद कुलकर्णी । २८७
- जगद्गुरू तुकाराममहाराजांचे चौदा टाळकरी : सुरेश विठ्ठल मेहेर । २९५
- संत तुकोबारायांचा कथा–कीर्तन महिमा : डॉ. सुभाष बागल । ३०१
- संतसाहित्यातील मूल्यविचार : डॉ. अशोक लिंबेकर । ३१२
- वारकरी संप्रदाय व वारी परंपरा : प्रा. डॉ. संतोष चव्हाण । ३१७
- वारकरी संप्रदायात संतांचा सांगीतिक दृष्टिकोन : प्रा. डॉ. भागवत लहुबुवा ढोले । ३२२
- वारकरी संप्रदाय : एक परिपूर्ण विचार : डॉ. नाथराव ज्ञानोबा गरजाळे । ३२६
- संत एकनाथकृत हरिपाठ : एक चिंतन । डॉ. ज्ञानेश्वर थोरात / ३३२
- संत तुकारामांच्या अभंगांची समाजशास्त्रीय समीक्षा : प्रा. डॉ. रामचंद्र झाडे । ३३५
- स्वाध्याय विचार आंतरराष्ट्रीय कार्य स्वरूप : प्रा. डॉ. दिलीप स. बिरुटे । ३३८
- संत चोखामेळा : बहुजनांचे उद्गाते : ललिता मानसिंग गोपाळ । ३४४
- पर्यावरणाचे प्रणेते : संत सावतामाळी : डॉ. सुवर्णा चव्हाण–गुंड । ३४८
- मोगरा फुलला : प्रा. मयुरी पवार । ३५६
- संतांची समतेची गुढी : सविता शिवदे–गोसावी । ३६१
- वारकरी आणि महानुभाव तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक विचार : डॉ. न. ब. कदम । ३६५
- नाथसंप्रदाय व वारकरी संप्रदाय नाते चैतन्याचे : डॉ. राधिका पारसनिस–गुप्ते । ३७१
- वारकरी संप्रदाय उदय आणि विकास : डॉ. फापाळे एम. डी. । ३७७
- विदेही संत कवयित्री : संतामाई निंभोरकर : डॉ. रामचंद्र शंकर जाधव । ३८३
- मधुराद्वैताचार्य श्री संत गुलाबरावमहाराज : डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे । ३८९
- आजचे ग्रामीण वास्तव आणि तुकडोजींची ग्रामगीता : प्रा. मिलिंद जोशी । ३९६
- संत मांदियाळीतील चमकणारा तारा : संत जनाबाई : डॉ. सुमंगला विजय बाकरे । ४०२
- अंबाजोगाईचे संत : दासोपंत गोस्वामी : डॉ. वैशाली गोस्वामी–कुलकर्णी । ४०५
- वारकरी संप्रदाय आणि संत चूडामणीमहाराज देगलूरकर : महेश कुंडलीकर । ४१२
- संत निर्मळा : व्यक्ती आणि वाङ्मय : प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर । ४१४
- बंजारा समाज सुधारक : संत सेवालालमहाराज : प्रा. डॉ. गजानन पांडुरंग जाधव । ४१९


PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# मधुराद्वैताचार्य श्री संत गुलाबरावमहाराज

डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे

**श्री गुलाबरावमहाराजांची ग्रंथसंपदा ही फक्त एका धर्मोपदेशकाचीच नसून भक्तिशास्त्र, ज्ञान, उपासना, नाममाहात्म्य, नीतिशास्त्र, मानसायुर्वेद, काव्यशास्त्र, संगीत, शिक्षण, विज्ञान, आरोग्य इत्यादी विविध विषय त्यांच्या ग्रंथात आलेले आहेत; म्हणूनच त्यांचा न. चि. केळकर, मामासाहेब दांडेकर, लता मंगेशकर, दत्तोपंत ठेंगडी अशा विविध क्षेत्रातील विद्वानांनी गौरव केला आहे. अवघ्या चौतीस वर्षांच्या आयुष्यात त्यांनी जी ग्रंथनिर्मिती केली ती पाहिली तर कोणतीही व्यक्ती भारावून जाईल, यात शंका नाही.**

भारत देशाला तत्त्वज्ञ, विचारवंत, संतांची महान परंपरा लाभलेली आहे. त्यांनी प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक अध्यात्मशास्त्रामध्ये नवेनवे सिद्धांत मांडले. तद्वतच श्रेष्ठ अशा प्रवृत्ती, विचारधारा देशाला दिल्या. प्राचीन काळात षट्दर्शने लिहिली गेली. काही दर्शने आस्तिक, तर काही दर्शने नास्तिक होत. त्यामध्ये स्वतंत्र आधार असणारे न्याय, सांख्य, योग, कर्मकांडाला महत्त्व देणारे, मीमांसा, ज्ञानकांडाला महत्त्व देणारे, वेदांत (आस्तिक), तर नास्तिक दर्शनांमध्ये चार्वाक, जैन व बौद्ध दर्शनांचा अंतर्भाव होतो. प्रस्तुत निबंधाच्या विषय अनुषंगाने वेदांत दर्शनांचा विस्तार असणाऱ्या मधुराद्वैताचार्य गुलाबरावमहाराजांच्या वाङ्मयीन कार्यावर येथे प्रकाश टाकण्याचे स्मित प्रयोजन असल्याने प्रारंभी वेदांत दर्शनाचे किंबहुना शास्त्राचे अधिष्ठानपर साहित्य आणि वादाची परंपरा संक्षिप्त स्वरूपात मांडणे उचित ठरेल.

वेदांत दर्शन भव्यदिव्य प्रासाद ज्या तीन भिंतीवर उभा आहे, त्यामध्ये उपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि गीता यांचा उल्लेख करावा लागतो. वेदांतशास्त्रातील अद्वैतवादाचे संस्थापक शंकराचार्य यांनी उपरोक्त तीनही ग्रंथावर भाष्य लिहून आपला सिद्धांत प्रस्थापित केला आहे. इतर विचारांनाही हे भाष्य आधार बनलेले आहे. वेदांत संप्रदायाच्या प्रवर्तक आचार्यांमध्ये क्रमाने शंकराचार्य (अद्वैतवाद), भास्कराचार्य (भेदाभेदवाद), रामानुज (विशिष्टाद्वैतवाद), माध्वाचार्य (द्वैतवाद), निंबार्काचार्य (द्वैताद्वैतवाद), श्रीकंठाचार्य (शैव-विशिष्टाद्वैतवाद), श्रीपती आचार्य (वीर-शैव विशिष्टद्वैतवाद), वल्लभाचार्य (शुद्धाद्वैतवाद), विज्ञानभिक्षु (अविभागाद्वैतवाद),

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

बलदेवस्वामी (अनित्यभेदाभेद) क्रमाने त्यांची भाष्ये शारीरिकभाष्य, भास्करभाष्य, श्रीभाष्य, पूर्णप्रज्ञाभाष्य, वेदांतपारिजात, शैवभाष्य, श्रीकरभाष्य, अणुभाष्य, विज्ञानामृतभाष्य, गोविंदभाष्यही आहेत.

उपरोक्त भाष्यकारांमध्ये शंकराचार्य, रामानुज, माध्वाचार्य, निम्बार्क आणि वल्लभाचार्य यांच्या मतांना बऱ्यापैकी मान्यता मिळाली. त्यातही विशेष मान्यता शंकराचार्य व रामानुज यांच्या सिद्धांतांना प्राप्त झाली व त्यांच्या मताचे, विचारांचे विस्ताराने अध्ययन करण्यात आले. याशिवाय संत ज्ञानेश्वरांनी आपल्या स्वतंत्र प्रज्ञेने लिहिलेल्या अमृतानुभव ग्रंथामध्ये चिद्विलासाची मांडणी केली, तर ज्ञानेश्वरांना आई म्हणणारे संत गुलाबरावमहाराजांनी मधुराद्वैताची मांडणी केली. मधुराद्वैत व मधुराभक्तीच्या संदर्भात विचार करण्यापूर्वी संत गुलाबरावमहाराजांचे संक्षिप्त चरित्र व वाङ्मयीन योगदान यांचा ऊहापोह करणे क्रमप्राप्त आहे.

**संक्षिप्त जीवन परिचय :**

प्रज्ञाचक्षू संत श्री गुलाबरावमहाराज यांचा जन्म ६ जुलै १८८१ रोजी अमरावतीजवळ असलेल्या लोणी टाकळी येथे झाला. त्यांचे माता-पिता गोंदुजी व अलकाबाई मोहोड हे होते. नवव्या महिन्यात डोळे येण्याचे निमित्त काय ते, त्यातून त्यांना अंधत्व आले. साधारणपणे वयाची पहिली तीन-चार वर्षे त्यांचे माधानला वास्तव्य होते. त्यानंतर त्यांच्या आजोळी लोणी टाकळी येथे सहा वर्षे राहिले. तद्नंतर इसवी सन १९०० पर्यंत माधानला परत वास्तव्य केले. याच काळात त्यांना दैवी गुणांचा प्रत्यय आला. लोकांकडून परिश्रम करून ग्रंथश्रवण करून घेऊ लागले.

बालपणी अगदी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या गुलाबरावमहाराजांना ३४ वर्षांचे अल्प आयुष्य मिळाले. इ. स. १९०० मध्ये त्यांनी पाटीलकी सोडून गृहत्याग केला. ज्ञानेश्वरांचा अनुग्रह १९०१ झाला. १९०२ मध्ये ग्वाल्हेरचे श्रीमंत जठार यांना पत्र लिहून मानभावमत समीक्षा, डार्विन, स्पेन्सर यांच्या मतांची समीक्षा केली. १९०३ मध्ये कात्यायनी व्रताचा आरंभ केला. १९०५ मध्ये श्री कृष्णाशी विवाह केला. पुढे त्यांनी नागपूरला ज्ञानेश्वर मुद्रणालय स्थापन केले. मधल्या काळात ग्रंथनिर्मिती सुरू होतीच. त्यांनी न. चिं. केळकर, संगीतकार पंडित भातखंडे, बाबा गर्दे आदी लोकांशी तात्त्विक चर्चा केली. श्री गुलाबरावमहाराजांचे चरित्र गूढ आणि विविध चमत्कारांचे कंगोरे त्याला आहेत. त्यामुळे त्यामध्ये खूप विस्तार न करता त्यांच्या वाङ्मयाचे अवलोकन करणे उचित ठरेल.

**संत गुलाबरावमहाराजांची ग्रंथसंपदा :**

श्री गुलाबरावमहाराजांच्या मुखातून ज्ञानाची गंगोत्री सतत वाहत होती. त्या वेगाने लिहिणे कुणालाही शक्य नव्हते. त्यांचे परमशिष्य बाबाजीमहाराज पंडित यांनी हे काम फार मोठ्या निष्ठेने केले. 'मी हळू हळू सांगतो लिहून घ्या,' असे ते म्हणत. तेव्हा तीन-तीन, चार-चार जण लिहिण्यासाठी तत्पर होते. पहिला पहिले वाक्य, दुसरा दुसरे वाक्य, तिसरा तिसरे वाक्य, चौथा चौथे वाक्य असे हे लेखनिकांचे काम पूर्ण होत असे. या संदर्भात ल. रा. पांगारकर लिहितात, 'ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत वगैरे मोठमोठ्या ग्रंथांची रचना कशी होत असेल याची मला कल्पना नव्हती, पण श्री महाराजांच्या सांनिध्यात त्या वाङ्मयनिर्मितीचे प्रत्यक्ष दर्शन मला घडले.'[१] श्री गुलाबरावमहाराजांच्या साहित्याची सूची बाबाजीमहाराज पंडित यांनी दिलेली आहे.

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

हे ज्ञानेश्वरा, तूच मला सांगितलेस की, सतत कृष्णसेवेत राहा. तूच मला तारणारा आहेस आणि मारणाराही आहे. माझी निजसत्ता तूच आहेस. आज मी किती भाग्याची ठरली, हे मी शब्दांत सांगू शकत नाही. नंदसूताच्या हाती हात देऊन माझ्या तातांने माझे कन्यादान केले आहे. म्हणूनच हे माउली मला हा खोडकर कृष्ण पती म्हणून खूप आवडला आहे. मला ब्रह्म, माया हे काही कळत नाही, पण हरीकडे जाण्याची माझी फार इच्छा आहे. तरी मी कित्येक तप करेल, पण माझ्या प्रिय पतीस मी मिळवेन.

संत गुलाबरावमहाराज ज्ञानेश्वर आईचा पदोपदी आपल्या रचनांमधून धावा करतात.

*'सुटो ज्ञानअभिमान । नस्पर्शोत दंभमान ।*

*हृदयी वृंदावन राही । शिरी ज्ञानेश्वर आई ।'* ३

संत ज्ञानेश्वरांवरील श्रद्धाभाव, गोपीभाव ठिकठिकाणी व्यक्त झाला आहे.

*'मज आडवे मांडिये घेऊनी । कृपाकटाक्षे निहाळिले'*

दिधला मंत्र चतुराक्षरी, असे एके ठिकाणी म्हणतात तर, एका हिंदी पदामध्ये ते लिहितात, 'मै गरीब हूँ अनाथ । जोरि कहूँ दोय हात । ज्ञानदेव दीनानाथ मेरे शिरताज है ।' कृष्णाला आपला पती मानून ज्ञानेश्वर माउलींनी स्वाधीन केले. ज्ञानेश्वरांचा प्रभाव गुलाबरावमहाराजांवर एवढा आहे की, ज्ञानेश्वरांविषयी 'भक्तिभाव' असणाऱ्या रचना त्यांच्या अनेक ग्रंथातून विखुरलेल्या दिसतील. 'संप्रदाय सुरतरू' हा ग्रंथ याचे उत्तम उदाहरण म्हणून देता येईल. माझ्यासाठी तू समाधी मोडून, आळंदी सोडून धावत ये. कारण तू माझी आई आहेस, माझ्या हातून ग्रंथलेखन करवून घेणारा आळंदीनाथा तूच आहेस. संत ज्ञानेश्वरांना गुलाबरावमहाराज सर्वस्व मानतात. 'चौसष्टी' ग्रंथाच्या प्रारंभी ते लिहितात,

*'ओम नमो ज्ञानेश्वरसद्गुरूआई । मस्तक ठेऊनि तुमचे पायीं ।*

*तुम्ही शिकविल्याची परीक्षा लवलाही । तुम्हां पुढे देते ती ऐका ।।'* ४ **(चौसष्टी)**

एवढ्यावरच ते थांबत नाहीत, तर तूच माय-बाप-कांत-बंधू-सोयरा-सज्जन असून, सौख्याचा सागरदेखील तुम्हीच आहात, असा श्रद्धाभाव व्यक्त करतात. ज्ञानेश्वरांचा अनेक उपाधी लावून देऊन ते सन्मान करतात. विश्वंभरा, चिंतामणी, पूर्णचंद्रा, करुणाघना, आनंदकंदा, दयाघना, आळंदीनाथा, करुणामूर्ती, भाग्यवंते, अलकावतिवल्लभ, परमानंद, ब्रह्म, तात, सद्गुरुआई इत्यादी. ज्ञानेश्वर, आळंदी यांपासून जो वेगळा राहिला त्याला 'योग' सापडणार नाही. 'तोचि विक्षेपाच्या सापडला हाती । ज्ञानेश्वर चित्ती नावडे ज्या ।। जन्मकोटी तया सापडे न योग । श्रीआळदींरंग न जाणता ।।'

**मधुराभक्ती व कात्यायनी व्रत :**

'कात्यायनी व्रत' हे मधुराभक्तीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण होते. 'गडे हो, आपण सर्व गोपी आहोत. अशी भावना करा व श्रीमद्भागवतातील कथेत वर्णन केल्याप्रमाणे गोपकुमारींना कात्यायनी व्रत करून श्री कृष्णाच्या रासक्रीडेचा अधिकार मिळविला. तसा आपणही मिळवू या,' असा संकल्प या व्रतात प्रारंभी केला जात होता. मधुराभक्तीमध्ये ईश्वराला प्रियकर-प्रेयसी या नात्यांमध्ये प्रेमाची आत्यंतिक उत्कटता असते. हा प्रेमाचा आविष्कार आत्यंतिक उत्कट असतो. यालाच 'मधुराभक्ती' म्हणून संबोधले जाते. संताच्या 'विराण्या' अशाच स्वरूपातून लिहिल्या आहेत.



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

## मधुराद्वैत :

कोणत्याही गोष्टीवर निष्ठा असली पाहिजे. गुलाबरावमहाराजांची माधुर्यभक्तीवर अंत्यतिक निष्ठा होती. निष्ठेमुळे 'मी'पणाचा लय होतो. त्यांच्या साररूप तत्त्वज्ञानाचा विचार केला तर ते म्हणतात, इंद्रियाचा, मनाचा, निरोध करून चित्त एकाग्र करणे त्याला योग म्हणावे, ब्रह्मज्ञान म्हणजे जागृती, मायेने मोहिते होणे याला सुषुप्ती म्हणावे, स्वप्न हा संसार होय. द्वैत-अद्वैताचा विचार त्यांनी खूपच अल्पाक्षरात पण व्यापकपणे सांगितला आहे.

*'अद्वैताची द्याया साक्ष ।*
*द्वैती सौंदर्य प्रत्यक्ष ।*
*ब्रह्म ते सुवर्ण रूप अलंकार ।*
*अति मनोहर दिसताती ।।'*

म्हणजेच द्वैत हे अद्वैताच्या विरोधी नाही, ते अद्वैताचेच एक रूप आहे. द्वैत म्हणजे दोन आणि अद्वैत म्हणजे एक ब्रह्म आणि माया या दोन्ही गोष्टी जरी वेगळ्या भासत असल्या तरी माया ही ब्रह्माचेच अंग होय. 'ब्रह्म सत्यजगत मिथ्या' हे शंकराचार्यांचे तत्त्व गुलाबरावांना महाराजांना अंशत: मान्य असले तरी संसाराचा त्याग ईश्वरप्राप्तीसाठी करावाच लागतो. हे तत्त्व त्यांनी मान्य केले नाही. त्यांच्या मते 'अनध्यसाविवर्त' या मायेत राहून, संसारात राहून संसाराच्या अर्थात मायेच्या माध्यमातून त्या अद्वैत ब्रह्माची प्राप्ती करता येऊ शकते, या मतावर गुलाबरावमहाराज ठाम होते. यासाठी त्यांनी सागर व लाटा, सोने आणि अलंकार हे दृष्टांत दिले.

संसारात राहून परमानंदाची प्राप्ती होऊ शकते. त्यासाठीच गृहस्थाश्रमाची नितांत गरज आहे, असे ते सांगतात. ब्रह्मरूपाचे वर्णन करताना त्यांनी चार महावाक्यामध्ये 'तत्त्वमसी'ला विशेष महत्त्व दिले आहे. 'तत्त्वमसी' म्हणजे 'तोच तू आहे'. 'अहं ब्रह्मास्मि' यामध्ये अविद्या आहे, असे ते म्हणतात. या वाक्यामुळे जीव ज्ञानांहकाराच्या बंधनात नाहक अडकतो. तत्त्वमसीमध्ये सर्वत्र केवळ चिद्विलास, सच्चिदानंदच प्राप्त होतो. म्हणजे गुलाबरावमहाराजांचा हा विचार किंबहुना मधुराद्वैतवाद ज्ञानेश्वरांच्या चिद्विलासाच्या जवळ जातो, असे म्हणावे लागते. आता आपण त्यांची मधुराभक्ती समजून घेऊ या -

## मधुराभक्ती :

गुलाबरावमहाराजांनी वयाच्या २२ व्या वर्षी श्रीमद्भागवतामध्ये सांगितल्याप्रमाणे कात्यायनी व्रत केले. तद्नंतर त्यांनी स्त्रीवेष धारण करायला सुरुवात केली. साधारणपणे मंगळसूत्र, कपाळी कुंकू, वेणी, बांगड्या इत्यादी शृंगार ते करीत असत. स्वत: जवळील संपत्ती किंबहुना ऐश्वर्य सांगताना ते म्हणतात,

*'ज्ञानेश्वर तात आणि कृष्ण पती ।*
*सौभाग्य संपत्ती नित्य मज ।।*
*त्यजूनि काम आज श्याम दृष्टी पाहिला ।*
*ज्या स्थळी मी जाई तेथ नित्य राहिला ।।*
*तू माझे सर्वस्व स्वामी ज्ञानेश्वरा ।*
*... वा तारा निजसत्ता ।।'* [2]

Govt. College of Arts & Science Aurangabad
Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

कृष्णाची गोपींनी केलेली भक्ती आणि त्यातून त्यांचा झालेला उद्धार यातून 'मधुराभक्तींची' संकल्पना उदयास आली. संत मीराबाई यांची मधुराभक्ती सर्वज्ञात आहे. गुलाबरावमहाराजांनी 'कात्यायनी व्रत' करून मधुराभक्तीचा अंगीकार केला. हे व्रत त्यांनी ३३ दिवस केले होते. स्वत:ला ज्ञानेश्वरकन्या म्हणून कृष्णपत्नीचा अधिकार प्राप्त करण्यासाठी हे खडतर महाव्रत त्यांनी केले.

अशाप्रकारे माधुर्यभक्तीचा आनंद देणारा महोत्सव त्यांच्यापासून सुरू झाला. त्यांनी माधुर्यभक्तीला स्थान दिले म्हणून त्यांना लोक 'मधुराद्वैताचार्य' म्हणू लागले. मधुराभक्ती हेच जीवनातील प्रमुख अंग बनत गेले. स्त्रीचा वेष धारण करून गोपीच्या वेषात आपले प्रेम कृष्णाच्या चरणी त्यांनी समर्पित केले. अगदी तन-मन-धनाने ते कृष्णमय झाले. त्यांच्या पदांमध्ये अभंगांमध्ये किंबहुना विविध रचनांमध्ये सतत माधुर्यभक्तीचाच प्रत्यय वाचकांना येत राहतो.

*'तो वल्लभा मी कांतू ऐसा पढिऐ ।*
*एऱ्हवी काही प्रेमा उपमा नसे ।।'*

भक्तीच्या खऱ्या स्वरूपासाठी, उत्कट प्रेमासाठी वल्लभ आणि कांता हीच उचित उपमा या प्रेमाला देता येईल. पत्नी किंबहुना त्याप्रमाणे सेवा करते, सखीप्रमाणे काळजी घेते, मातेप्रमाणे त्यांच्या हितचिंतनात तल्लीन असते त्याला खरी प्रेमिका म्हटले आहे आणि तोच भाव गुलाबरावमहाराजांच्या गोपीरूपात कृष्ण भक्तीत व्यक्त झाला आहे.

***'रडता रडता गुंजा झाले डोळे, न दिसे सावळे अजोनिया***
***काय करू आता शरण कोणा जाऊ, विश्वास ठेवू कवणावरी?'***

गुलाबरावमहाराजांची ही कृष्णाविषयीची आर्तता, ओढ हिंदीमध्ये तर अधिकच प्रभावी उतरली आहे.

*'मैं शाम शाम करू, जीवित अपना खोया,*
*अबला नहीं किसींने, शामसंदेशा लाया ।।'*

किंवा

*'हरिबिन मोहे और न काई*
*जनमजनम मोको वहि प्रिय होई।।'* [५]

'मधुराभक्ती' हा गुलाबरावमहाराजांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. माधुर्यभक्तीमुळे त्यांनी आपल्या एकूणच जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला. गौळणीच्या भूमिकेतून ते मधुराभक्तीत रंगून जातात. विरहामुळे त्यांची भक्ती अधिकच उत्कट होते. स्त्रीवेष, अलंकाराचा साज, कपाळी कुंकुम, हे मी कशासाठी केले आहे, तर हे नंदलाला, तुझ्यासाठीच ना? ते म्हणतात,

*'कधी येतील घरी नंदलाल,*
*आजची मंगलस्नान करूनि*
*सुकविले बाई बाल ।।*
*उतावीळ बहु मी तत्कंठी, घालाया फुलमाळ ।*
*ल्याली कुंकुम भाळ भरोनी केले निर्मळ गाल ।*
*आणाया सत्ताधीश प्रभू गुरू अलकावतिपाल ।।'*

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

माधुर्यभक्तीत गुलाबरावमहाराज आकंठ बुडून जातात. तृप्त होतात. अगदी 'सर्वभावे पती ध्यानी मनी' असणारे प्रेम म्हणजे माधुर्यभक्ती. स्वत:ला गोपी समजून श्री कृष्णावर माधुर्य प्रेम करतात. मदनाचा पुतळा, सौंदर्याची खाण असलेल्या श्री कृष्णाला पाहण्यासाठी आतुर होतात. ते म्हणतात, ''माझी एकच विनंती आहे, आपण मला आलिंगन द्यावे. मी आंधळी आहे. या भवसागरातून मला बाहेर काढा. तुम्ही कृपेचा सागर आहात, आमचा दुसरा कोण उद्धार करेल?' आर्त तळमळ, आर्जव ही अनेक गीतांतून व्यक्त होते. येथे मोक्षाची कल्पना तोटकी पडते. प्रेममय माधुर्याचा विजय होतो. भगवंत प्रेम, विरहावस्था या सर्वांमधून त्यांच्या काव्याची भाषा हृदयाचा ठाव घेत राहते. हरी विरहासक्ती म्हणजेच माधुर्यभक्ती होय

**काही निरीक्षणे :**

१. गुलाबरावमहाराजांना नवव्या महिन्यांत डोळे आल्याचे निमित्त होऊन अंधत्व प्राप्त झाले असताना त्यांनी आत्यंतिक परिश्रम घेऊन इतरांकडून ग्रंथाचे वाचन करवून घेतले व ज्ञान आत्मसात केले आणि स्वत:ची मधुराद्वैताची मांडणी केली.

२. अल्प आयुष्यात अफाट ग्रंथनिर्मिती केली. विविध विषयांवर व्यापकपणे त्यांनी लेखन केले. त्यांची ग्रंथनिर्मिती व तत्त्वज्ञानाकडे पाहिले तर व्यासंग दांडगा होता, हे निर्विवाद सत्य आहे.

३. ज्ञानेश्वरांना आई मानले, कृष्णाला पती मानून गोपीभाव पत्करला व माधुर्यभक्तीचा पुरस्कार केला.

४. ज्ञानेश्वरसद्गुरूआई, कृष्णाचे पत्नीत्व, आळंदी नित्यतीर्थ व गोपीभावामुळे वृंदावनाला महत्त्व या बाबी त्यांची संपत्ती, किंबहुना त्यांना ते ऐश्वर्य समजत होते.

५. ग्रंथांना व ग्रंथवाचकांना ते गुरुस्थानी मानीत असत. ग्रंथाखेरीज इतर भौतिक गोष्टींचा त्यांना बिलकूल मोह नव्हता.

६. गुलाबरावमहाराजांनी अद्वैत तत्त्वज्ञान व साहित्य याची सांगड घातली व 'अनध्यस्ताविवर्त' या सिद्धांताचे मंडन केले.

७. 'कात्यायनी' हे ३३ दिवसांचे महाव्रत केले व गोपीभाव अंगीकारून माधुर्यभक्तीचा पुरस्कार केला.

८. गृहस्थाश्रमात राहून परमार्थ करता येतो, किंबहुना परमानंदाची प्राप्ती करवून घेता येते. यासाठी 'तत्त्वमसी' या महावाक्याचा विचार पटवून दिला.

९. शंकराचार्यांचा जगाला 'मिथ्य' मानने हा विचार त्यांनी स्वीकारला नाही. मायेत म्हणजे संसारात राहून आपण ब्रह्माची प्राप्ती करू शकतो, या मतांचा त्यांनी हिरिरीने पुरस्कार केला.

१०. 'माधुर्य–भक्ती' हिलाच शिरोधार्य किंबहुना मधुराद्वैत संप्रदायाची मुख्य देवता मानून मधुराद्वैताची मांडणी केली व 'मधुराद्वैताचार्य' होण्याचा मान त्यांनी मिळविला.

११. मधुराद्वैत संप्रदायप्रवर्तक श्री गुलाबरावमहाराज यांचे भाष्यकार म्हणून त्यांचेच परमशिष्य श्री बाबाजीमहाराज पंडित यांचे योगदान फार महत्त्वाचे आहे.

प्रारंभी उल्लेख केल्याप्रमाणे वैदिक संप्रदायात धर्माच्या बाबतीत विविध विचारसरणी, वाद, अस्तित्ववाद आले. तसाच 'मधुराद्वैत' संप्रदायाचे श्रेय हे संत गुलाबरावमहाराजांकडे जाते. या संप्रदायाचे उपास्य दैवत श्री कृष्ण आहे. हा संप्रदाय पूर्णत: वैदिक असून पौराणिक तत्त्वज्ञानाचे अनुसरण करणारा आहे. या संप्रदायाचे उपास्य श्री कृष्ण असले तरी गुरुस्थानी मात्र संत ज्ञानेश्वर आहेत. 'वृंदावन' व आळंदी स्थानाला विशेष महत्त्व



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

आहे. तसेच महत्त्व मधुराद्वैत संप्रदायामध्येही आहे. गुलाबरावमहाराजांनी वारकरी पंथाला पतनशीलता कमी करणारा, आन्तवैराग्य साधून देणारा गृहस्थाश्रमाचा अलिखित नियम, असे म्हटले. वारकरी संप्रदायाप्रमाणे मधुराद्वैत संप्रदायात सर्वसामान्यांना उद्धरून जाण्याचा सोपा मार्ग सांगितला आहे. गुलाबरावमहाराजांच्या विचारांवर वारकरी संप्रदायातील विचारांचा, तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. त्यांच्या बऱ्याच ग्रंथामध्ये ज्ञानेश्वर, तुकाराम आदि संताचे संदर्भ येतात.

थोडक्यात, श्री गुलाबरावमहाराजांची ग्रंथसंपदा ही फक्त एका धर्मोपदेशकाचीच नसून भक्तिशास्त्र, ज्ञान, उपासना, नाममहात्म्य, नीतिशास्त्र, मानसायुर्वेद, काव्यशास्त्र, संगीत, शिक्षण, विज्ञान, आरोग्य इत्यादी विविध विषय त्यांच्या ग्रंथात आलेले आहेत. म्हणूनच त्यांचा न. चिं. केळकर, मामासाहेब दांडेकर, लता मंगेशकर, दत्तोपंत ठेंगडी अशा विविध क्षेत्रातील विद्वानांनी गौरव केला आहे. अवघ्या चौतीस वर्षांच्या आयुष्यात त्यांनी जी ग्रंथनिर्मिती केली ती पाहिली तर कोणतीही व्यक्ती भारावून जाईल, यात शंका नाही.


संदर्भ :

१. पंडित बाबाजीमहाराज, अमृतानुभव कौमुदी, आवृत्ती चौथी, १९९९, पृ. १४
२. श्री गुलाबरावमहाराज, मराठी पदांची गाथा, पृ. २३ व २४
३. श्री गुलाबरावमहाराजांची अभंगाची गाथा, नारायण पैकाजी पंडित (संपा.) सन १९३९, पृ. ४२
४. अमृतानुभव - कौमुदी, पंडित बाबाजीमहाराज, तत्रैव, पृ. ८९
५. श्री गुलाबरावमहाराज, संप्रदाय सुरतरू भाग -२, अ. २०, ओ. ४६२

इतर संदर्भग्रंथ :

१. हरिपाठरहस्य - श्री बाबाजीमहाराज पंडित.
२. ज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका
३. श्री गुलाबरावमहाराजांची विचारसंपदा - डॉ. कृ. मा. घराटे (पीएच.डी. प्रबंध)
४. श्री गुलाबरावमहाराज - संप्रदाय सरतरू
५. मधुराद्वैताचार्य श्री गुलाबरावमहाराज यांचे चरित्र - राजेश्वरशास्त्री त्रिपुरवार
६. श्री गुलाबरावमहाराज परिचय (हिंदी) डॉ. कृष्ण माधव घराटे



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad